**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (पुर्व),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

**जावक क्र: व.वि.श.म./ /  /२५-२६**
**दिनांक : 12/08/2025**

**वसई-विरार शहर महानगरपालिका**

**”घरोघरी तिरंगा” मोहिमेअंतर्गत महानगरपालिकेमार्फत “तिरंगा दौड” व “बाईक रॅली” सह “वृक्षारोपण” कार्यक्रम संपन्न**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत सन 2025 मध्ये सुद्धा “घरोघरी तिरंगा” मोहिम महानगरपालिका क्षेत्रात राबविण्यात येत असून आज दि.12 ऑगस्ट, 2025 रोजी सकाळी 08.00 वाजता “घरोघरी तिरंगा” अभियानांतर्गत महानगरपालिका क्रीडा विभागामार्फत 03 कि.मी.पर्यंतच्या “तिरंगा दौड” चे आयोजन महानगरपालिका मुख्यालयाच्या ठिकाणी करण्यात आले होते. यामध्ये विविध शाळेतील विद्यार्थ्यांनी, धावपटूंनी  भाग घेतला. यावेळी 30 फुट लांबीचा तिरंगा ध्वज घेऊन विद्यार्थी व उपस्थितांमार्फत देशभक्तीपर घोषणा देण्यात आल्या. उपस्थित नागरिकांनीही विद्यार्थी व धावपटू यांचे सोबत या तिरंगा दौड मध्ये सहभागी होऊन उत्तम देशभक्तीपर वातावरण निर्माण केले. या तिरंगा दौड मध्ये 300 च्या वर विद्यार्थी व नागरिक सहभागी झाले होते. यावेळी शालेय शिक्षक, नागरिक, महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या प्रभाग समित्यांमार्फतही घरोघरी तिरंगा अभियानांतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. विविध प्रभाग समित्यांमार्फत आज “बाईक रॅलीचे” व “वृक्षारोपण कार्यक्रमाचे” आयोजन करण्यात आले होते. बाईक रॅलीमध्ये प्रभाग समिती मधील सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच अग्निशमन विभागाचे कर्मचारी यांनी भाग घेतला. यावेळी तिरंगा ध्वज हाती घेवून देशभक्तीपर घोषणा देण्यात आल्या. सर्व नागरिकांनी दि.15 ऑगस्ट 2025 रोजीपर्यंत आपल्या घरावर, इमारतीवर, आस्थापनेवर देशाचा तिरंगा ध्वज फडकवून “घरोघरी तिरंगा” या राष्ट्रभक्तीने प्रेरित अभियानात सहभागी होण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. त्याचप्रमाणे प्रभागांमार्फत विविध ठिकाणी वृक्षारोपणही करण्यात आले.